# निर्लेखित साहीत्य तसेच भंगार विक्री बाबत जाहीरात

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,अंबरनाथ, जि. ठाणे या संस्थेतील वापरुन निर्लेखित झालेल्या साहित्याची विक्री करावयाची आहे. आहे त्या स्थितीत निविदा पध्दतीने विक्री करणे प्रस्तावित आहे. यामध्ये निर्लेखित यंत्रसामुग्री व हत्यारे व उपकरणे फर्नीचर तसेच एम.एस.जॉब स्क्रॅप व ईतर स्क्रॅपचा समावेश आहे. सदर निविदा प्रक्रीये करीता सीलबंद लिफाफा पध्दतीने निविदा सादर करावयाची आहे. त्यासाठी फक्त जी.एस.टी. नोंदणी धारक खरेदीदारांकडुन सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. विक्री करावयाच्या वस्तु संस्थेतील संबंधित विभागामध्ये दिनांक २६/१२/२०२३ ते ०८/०१/२०२४ रोजीच्या कालावधीमध्ये सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुटीचे दीवस वगळुन) पहावयाच मिळतील याच कालावधी दरम्यान सादर करावयाचा विहीत नमुन्यातील निविदा अर्ज ३००/-(रुपये तिनशे मात्र) ना परतावा किंमतीत संस्थेच्या कार्यालयामधुन विकत घेता येईल. सदर नमुन्यातील पुर्ण माहिती अचुकपणे भरलेली निवीदा अर्जासोबत रुपये १५००००/- (अक्षरी रुपये एक लाख् पन्नास हजार मात्र) अनामत रक्कम जमा करणे आवश्यक आहे. सदर रकमेचा भरणा ( Registrar, Industrial Training Institute, Ambernath ) या नावाने डी.डी.च्या स्वरुपात करावा. ईच्छुक जी.एस.टी.नोंदणी धारक खरेदीदारांनी वर उल्लेखिलेल्या विहीत नमुन्यातील निविदा अर्ज डी.डी. सह प्रपत्र अ व प्रपत्र ब करीता वेगळा स्वतंत्र लिफाफा दयावा. दिनांक ११/०१/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत सीलबंद लिफाफा भांडारामध्ये उपलब्ध असलेल्या सीलबंद निवीदा पेटी मध्ये टाकावा. संपुर्ण निविदा प्रक्रीया रदद करण्याचा अधिकार अथवा त्यामध्ये फेरबदल करण्याचा संपुर्ण अधिकार मा. प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अंबरनाथ जि. ठाणे हे राखुन ठेवत आहेत.

सदर सीलबंद निविदा दिनांक १६/०१/२०२४ रोजी दुपारी ११.०० वाजता संस्थेच्या ग्रंथालयात उघडण्यांत येईल.

प्राचार्य
औद्योगिक प्रशिक्षण संस्था
अंबरनाथ जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२५१-२६१०३९५